राज्य महामार्गावरील खड्डे पाच दिवसात बुजवा अन्यथा महामार्गावर आंदोलन करणार >> पान 2

मनाला येईल त्याप्रमाणे प्रभाग रचना झाली >> पान 3

कर्जमाफीबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा; मात्र माजी मंत्री बच्चू कडू आंदोलनावर ठाम >> पान 4

**सुविचार**

स्वतःच्या क्षमतांवर विश्वास ठेवा.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 273 ■ शनिवार, दि. 14 जून 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




बॉलिवूडमधील राशा ठडानी आणि अभय वर्मा पडद्यावर दिसणार एकत्र

आतील पान

## सोमवारपासून राज्यात नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात; 'शाळा प्रवेशोत्सवा'च्या माध्यमातून होणार विद्यार्थ्यांचे स्वागत

**मुंबई/प्रतिनिधी :** पुढील शैक्षणिक वर्षाची सुरुवात विदर्भ वगळता इतर सर्व विभागांत सोमवार दि. १६ जून रोजी तर विदर्भात सोमवार दि. २३ जून २०२५ पासून होणार आहे. शाळा सुरू होण्याच्या पहिल्या दिवशी 'शाळा प्रवेशोत्सवा'च्या माध्यमातून मान्यवरांच्या उपस्थितीत सर्व नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात येणार असल्याची माहिती शालेय शिक्षण विभागामार्फत देण्यात आली आहे.

शाळेची गुणवत्ता वृद्धींगत करण्यासाठी व मुलांची उपस्थिती वाढविण्याकरीता शालेय शिक्षण विभागामार्फत राज्यभर 'शाळा प्रवेशोत्सव' उपक्रम साजरा करण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सर्व मंत्री, राज्यमंत्री तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी, सर्व अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव यांना नजिकच्या शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेमध्ये भेट देण्यासाठी कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता, मोफत पाठ्यपुस्तके, मोफत शालेय गणवेश व इतर सोयी सुविधांचा आढावा घेण्यात येईल. तसेच शाळा व्यवस्थापन समिती, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, नगरसेवक यांच्याशी चर्चा करुन विद्यार्थ्यांचा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेत प्रवेश घेण्याकडे कल कसा वाढेल, यासाठी आवश्यक उपाययोजना सुचविण्यात येतील.



राज्यातील लोकप्रतिनिधींबरोबरच वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शाळा सुरू होण्याच्या पहिल्या दिवशी शाळांना भेट द्यावी याबाबत मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी नुकताच आढावा घेतला. सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महानगरपालिकांचे आयुक्त, जिल्हा स्तरावरील विविध विभागांचे अधिकारी यांनी शाळांना भेट देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करावे. त्याचबरोबर शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी आणि शाळांच्या सर्वांगीण विकासासाठी उपाययोजना सूचवाव्यात, असे आवाहन त्यांनी केले.

विद्यार्थ्यांमध्ये संख्याज्ञान व कौशल्य विकसित करण्यासाठी राज्यात निपूण महाराष्ट्र अभियान राबविण्यात येत आहे. याअंतर्गत दुसरी ते पाचवीच्या वर्गातील किमान ७५ टक्के विद्यार्थ्यांना इयत्तेनुसार अध्ययन क्षमता प्राप्त >> पान २





## स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी दोन्ही राष्ट्रवादींची युती?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून पक्षाचा वर्धापन दिन स्वतंत्र कार्यक्रम घेत साजरा करण्यात आला. दोन्ही गट पुन्हा एकत्र येणार अशा चर्चांच्या पार्श्र्वभूमीवर हे कार्यक्रम पार पडले. महाराष्ट्रातील महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपालिका यांच्या निवडणुका येत्या काळात होणार आहेत. प्रभाग रचनासंदर्भातील आदेश जारी करण्यात आले आहेत. या पार्श्र्वभूमीवर राजकीय पक्षांकडून देखील जोरदार तयारी सुरु आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत भाजप वगळता कुणाशीही राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाची युती कुणाशीही होऊ शकते, अशी माहिती राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या वरिष्ठ सूत्रांकडून देण्यात आली आहे.**

राष्ट्रवादी काँग्रेस भाजपसोडून कुणाशी देखील युतीसाठी तयार आहे, अशी माहिती पक्षातील वरिष्ठ सूत्रांकडून देण्यात आली आहे. यामुळं युतीसाठी अजित पवार यांच्या पक्षाचा ही पर्याय राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षासाठी खुला राहणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून युतीबाबतचे सर्व अधिकार स्थानिक पातळीच्या नेत्यांवर सोपवले जाणार आहेत, अशी माहिती देखील सूत्रांकडून देण्यात आली आहे.

मविआचं काय होणार?

महाविकास आघाडीतील घटक पक्षांची स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीत एकत्र येण्यास फारसे इच्छूक नसल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली आहे. अद्याप महाविकास आघाडीत स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीत एकत्र येण्याबाबत कोणतीच चर्चा नाही, अशी माहिती देखील आहे.

महाविकास आघाडीतील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षासाठी मुंबई महानगरपालिका महत्त्वाची आहे. यापूर्वी मुंबई महानगरपालिकेत शिवसेना आणि काँग्रेस यांच्यात लढत व्हायची. आता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून मुंबई महापालिका निवडणुकीसाठी नवी रणनीती राबवली जाण्याची शक्यता आहे. ठाकरेंच्या शिवसेनेकडून मनसेसोबत युतीच्या चाचपणीचा प्रयत्न केला जात आहे. त्याशिवाय मुंबईत काँग्रेस देखील स्वबळावर लढू शकते. तर, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची फारशी ताकद मुंबईत नसल्यानं त्यांची युती काँग्रेस सोबत किंवा इतर पक्षांसोबत होऊ शकते.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये २ जुलै २०२२ ला फूट पडली होती. अजित पवार आणि इतर नेते एकनाथ शिंदे यांच्या मंत्रिमंडळात दाखल झाले होते. सध्या अजित पवारांचा पक्ष भाजपसोबत युतीत आहे. भाजप देखील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक स्वबळावर लढवण्याचा पर्याय स्वीकारु शकतं. त्यामुळं राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या निमित्तानं पुन्हा एकत्र येतात का ते लवकरच पाहायला मिळेल.

**शरद पवार भाजप वगळता कुणासोबतही जाण्यास तयार; मग महाविकास आघाडीचे काय?**



### सेल्फी वेड्यांची विकृती, विमान अपघातानंतर रस्त्यावर पडले महिलेचे शीर, लोकांनी त्यासोबतच घेतले सेल्फी

**अहमदाबाद/वृत्तसंस्था :** अहमदाबादमध्ये गुरुवारी एअर इंडियाच्या विमानाचा भीषण अपघात झाला. या अपघाताने संपूर्ण देश हादरला. एअर इंडियाच्या विमानाने सरदार वल्लभभाई पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळावरून उड्डाण केले आणि काही वेळातच विमानाचे नियंत्रण सुटले आणि मेघानी नगर परिसरात अपघात झाला. विमानात २४२ प्रवासी आणि कर्मचारी होते. या अपघातात एकूण २६५ जणांचा मृत्यू झाला आहे. विमान क्रॅश झाल्यानंतर मोठी आग लागली होती. घटनास्थळी जळालेले अवशेष, धूर आणि लोकांचे मृतदेह विखुरले होते. हे दृश्य पाहून संपूर्ण देशात हळहळ व्यक्त होत असतानाच एक संतापजनक घटना उघडकीस आली आहे.

### वारकऱ्यांच्या सेवेसाठी 'चरणसेवा', मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचा उपक्रम; ५ हजार वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी सज्ज

**मुंबई/प्रतिनिधी :** पंढरपूरच्या दिशेने निघालेल्या लाखो वारकऱ्यांसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार आणि दूरदृष्टीतून मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षातर्फे 'चरणसेवा' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. राज्यातील नाशिक, जालना, सातारा, सोलापूर आणि पुणे या पाच जिल्ह्यांतून निघणाऱ्या पालख्यांमध्ये सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांची आरोग्य तपासणी, उपचार आणि 'चरणसेवा' करण्यासाठी सुमारे पाच हजार वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत.

आषाढी वारी ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेचा गाभा आहे. या वारीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष सज्ज असून, त्यांच्याद्वारे 'चरणसेवा' उपक्रम हाती

## शनिशिंगणापूर देवस्थानचा मोठा निर्णय

### ११४ मुस्लिम कर्मचाऱ्यांसह १६७ जणांना दिला नारळ; हिंदुत्ववादी संघटनांनी घेतला होता आक्षेप

**अहिल्यानगर/प्रतिनिधी :** अहिल्यानगरमधील शनिशिंगणापूर देवस्थानने मोठा निर्णय घेतला आहे. शनि देवस्थान इथं कार्यरत असलेले १६७ कर्मचाऱ्यांना कामावरुन काढून टाकण्यात आले आहे. काढून टाकण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये ११४ मुस्लिम कर्मचाऱ्यांचा समावेश होता. अनियमितता आणि शिस्तचं पालन न केल्याच्या कारणावरुन करम्चाऱ्यांना काढण्यात आल्याचे स्पष्टीकरण शनि देवस्थानकडून देण्यात आलं आहे.

दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून मुस्लिम कर्मचाऱ्यांना काढण्याबाबत हिंदू संघटनांनी दबाव आणला होता. शनि देवाच्या चौथ्याऱ्यावर मुस्लिम लोकांच्या हाताने काम करुन घेतल्यामुळे सकल हिंदू समाजाच्या वतीने आंदोलन करण्यात आले होते.

अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रसिद्ध धार्मिक स्थळ श्री क्षेत्र शनि शिंगणापूर मंदिरात मुस्लिम कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीवरुन वाद वाढला होता. शनि शिंगणापूर मंदिर ट्रस्टमध्ये काम करणाऱ्या ११४ मुस्लिम कर्मचाऱ्यांविरुद्ध हिंदू संघटना आक्रमक झाल्या आहेत. ट्रस्टने



सर्व मुस्लिम कर्मचाऱ्यांना तात्काळ कामावरुन काढून टाकावे अशी संघटनेची मागणी होती. अन्यथा १४ जून रोजी मंदिराबाहेर संपूर्ण हिंदू समाजाकडून मोठा मोर्चा काढला जाईल, असा इशारा देखील दिला होता.

२१ मे २०२५ रोजी मुस्लिम कारागिरांनी मंदिराच्या पवित्र व्यासपीठावर ग्रिल बसवले आणि भगवान शनिदेवाच्या व्यासपीठाची स्वच्छता आणि रंगरंगोटी केली होती. तेव्हा हे प्रकरण अधिकच तापले होते. या घटनेची माहिती मिळताच महाराष्ट्र मंदिर महासंघ आणि हिंदू संघटनांनी तीव्र आक्षेप घेतला होता. त्यानंतर आता मंदिराच्या विश्र्वस्त मंडळाने सर्व मुस्लिम कर्मचाऱ्यांना काढून टाकण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत मंदिर ट्रस्टने स्पष्टीकरण दिलं होतं, त्यानुसार ट्रस्टमध्ये ११४ मुस्लिम कर्मचारी काम करतात हे मान्य केलं आहे. मात्र ट्रस्टच्या म्हणण्यानुसार, या कर्मचाऱ्यांपैकी एकाही मुस्लिम कर्मचाऱ्याची ड्युटी मंदिराच्या मुख्य गर्भगृहात किंवा चबुतऱ्यावर नाही. हे कर्मचारी मुख्यतः शेती विभाग, कचरा व्यवस्थापन विभाग आणि शिक्षणाशी संबंधित कामांमध्ये कार्यरत आहेत. यापैकी ९९ कर्मचारी मागील पाच महिन्यांपासून कामावर अनुपस्थित असून त्यांच्या पगारावरही आळा घालण्यात आला आहे. उरलेले १५ कर्मचारी अनेक वर्षांपासून सेवा देत आहेत, ज्यात काहींचा अनुभव २० वर्षांहून अधिक आहे. शनि शिंगणापूर मंदिर ट्रस्टमध्ये काम करणाऱ्या ११४ मुस्लिम कर्मचाऱ्यांना कामावरुन काढून टाकावे या मागणीसाठी हिंदू संघटना आक्रमक झली होती. याबाबत उद्या (१४ जून) मोर्चा काढण्याचाही इशारा दिला होता.



### हरित ऊर्जा विकासाचे प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करा : मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी :** जनतेला स्वस्त दरात व जास्तीत जास्त वीज उपलब्ध करून देण्याचे शासनाचे धोरण आहे. ऊर्जा क्षेत्रातील पायाभूत सुविधा बळकट करण्यासाठी ऊर्जा विभागाने कालबद्ध नियोजन करावे. आगामी काळात हरित ऊर्जा विकासावर भर देण्याची गरज असून वीज वितरण व्यवस्था सक्षम करण्यासाठी नियोजित वेळेत प्रकल्प पूर्ण करण्यावर भर द्यावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. >> पान २

### अपघातग्रस्त विमानात राष्ट्रवादीचे खासदार सुनील तटकरेंच्या नातेवाईक अपर्णा महाडिकांचा समावेश



**मुंबई/प्रतिनिधी :** गुजरातमधील अहमदाबादमध्ये एअर इंडियाच्या विमानाला अपघात झाल्यानंतर एकच खळबळ उडाली आहे. अहमदाबाद विमानतळावरून उड्डाण केल्यानंतर अवघ्या पाच मिनिटांतच विमानाला अपघात झाला. विमानात २४२ लोक होते, ज्यात १२ क्रू मेंबर्स होते. अपर्णा महाडिकदेखील क्रू मेंबर्समध्ये होत्या. अपर्णा ही राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार सुनील तटकरे यांची नातेवाईक आहे. ती तटकरेंची चुलत बहीण आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे म्हणाले की, ''अहमदाबादमध्ये कोसळलेल्या एअर इंडियाच्या विमानातील वरिष्ठ क्रू मेंबर अपर्णा महाडिक मझ्या नातेवाईक आहेत. >> पान २

## जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही - उपमुख्यमंत्री अजित पवार

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्यातील सर्व जिल्ह्यांचा समतोल विकास साधण्यासाठी आवश्यक तेवढा निधी उपलब्ध करून दिला जात आहे. बुलढाणा जिल्ह्याच्या विकासासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही. विकासकामांसाठी शासन आवश्यक ते सर्व सहकार्य करेल, असे आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. यावेळी मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मकरंद पाटील उपस्थित होते.

खामगाव दौऱ्यात उपमुख्यमंत्री ना. पवार यांनी पत्रकार परिषदेत बोलताना जिल्ह्यातील विविध विकास प्रकल्पांचा व प्रलंबित कामांची माहिती घेतली. त्यांनी पुढे सांगितले की, ग्रामीण रस्ते, सिंचन सुविधा, आरोग्य सेवा, शिक्षण व इतर पायाभूत सुविधांसाठी राज्य सरकारकडून विशेष निधीची तरतूद केली जाईल. जिल्ह्यातील मागास भागांचा सर्वांगीण विकास, शेतकऱ्यांचे सक्षमीकरण आणि युवकांना रोजगाराच्या संधी निर्माण करणे, हे आमचे प्राधान्य आहे, असेही त्यांनी नमूद केले.

राज्याचा आर्थिक विकास समतोल होण्यासाठी अर्थसंकल्पामध्ये सर्व विभागासाठी निधीची तरतुद करण्यात आली आहे. लाडकी बहिण व लाडका भाऊ योजनासाठी विशेष तरतुद करण्यात आली असून लाभार्थ्यांना लाभ दिल्या जात आहे. सोबतच इतर विभागावर निधीची कमतरता भासू देणार नाही, याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. अनुसूचित जाती, जमाती व आदिवासी योजनासाठी गेल्या वर्षापेक्षा जास्त तरतूद केली असून सर्वसमावेशक विकास साध्य करण्याचा शासनाचा मानस असल्याचे उपमुख्यमंत्री ना. अजित पवार यांनी व्यक्त केला.



## रक्तदान सर्वश्रेष्ठ दान !

आज १४ जून, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक रक्तदान दिन म्हणून साजरा केला जातो. ऑस्ट्रेलियातील डॉ कार्ल लॅंडस्टेनर या संशोधकाच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस जागतिक रक्तदाता दिन म्हणून साजरा केला जातो. १४ जून हा त्यांचा जन्मदिन आहे. डॉ कार्ल लॅंडस्टेनर यांनी 'एबीओ' हा नवा रक्तगट शोधून काढला त्यांच्या या संशोधनासाठी त्यांना नोबेल पारितोषिक मिळाले होते. पहिला जागतिक रक्तदाता दिन २००५ साली साजरा झाला होता. त्यानंतर दरवर्षी हा दिवस साजरा केला जातो. प्रत्येक वर्षी एक सूत्र घेऊन हा दिवस साजरा केला जातो. माता सुरक्षा, रक्तदान श्रेष्ठ दान, डोनेट प्लेटलेट्स यासारखे सूत्र घेऊन त्याची माहिती या दिवशी दिली जाते. रक्तदानाचे आवाहन केले जाते. जागतिक आरोग्य संघटनेने घोषित केलेल्या या दिवसाच्या साजरीकरणात रेड क्रॉस सोसायटीचा हिरीरीने भाग असतो. कौन्सिल ऑफ युरोप ही संघटना देखील रक्तदाना संदर्भात मोठ्या प्रमाणात जनजागृती करते. आपल्या देशात देखील विविध शासकीय, सामाजिक, सेवाभावी संस्था या दिवसाचे आयोजन करून लोकांमध्ये रक्तदाना संदर्भात जनजागृती करतात. या दिवशी रक्तदात्यांच्या सन्मान केला जातो. रक्तदान शिबिराचे आयोजन केले जाते. रक्तदान श्रेष्ठ दान असं म्हटलं जातं कारण या दानामुळे माणसाचा जीव वाचतो. सुरक्षित रक्त ही अलीकडची वैश्रि्वक समस्या निर्माण झाली आहे. दरवर्षी ९ कोटी युनिटपेक्षा अधिक रक्त दान केले जाते तरीही रक्ताचा तुटवडा जाणवतो. अपघातग्रस्त व्यक्ती, शस्त्रक्रिया झालेले व्यक्ती, रक्तातील त्रुटी असलेले व्याधीग्रस्त व्यक्ती, बाळंतपणात होणारे म तांचे मृत्यू आणि कुपोषण, विविध प्रकारचे बाळ मृत्यू, साथीचे आजार अशावेळी रक्ताची खूप गरज पडते. कोरोना काळात तर रक्ताचा कसा अभूतपूर्व तुटवडा जाणवला होता हे आपण पाहिलेच आहे. कोरोना काळात रक्तदान शिबिरे बंद असल्याने देशात रक्तदानाचा अभूतपूर्व असा तुटवडा जाणवला होता. रक्ताच्या तुटवड्यामुळे अनेक शस्त्रक्रिया पुढे ढकलाव्या लागल्या होत्या. पंतप्रधान आणि मुख्यमंत्री महोदयांनी नागरिकांना रक्तदान करावे असे आव्हान केले होते. भविष्यातही रक्ताचा असा तुटवडा निम ण होऊ शकतो. आपल्या रक्तामुळे कोणाचा तरी जीव वाचतो. म्हणूनच रक्तदानाला सर्वश्रेष्ठ दान असे म्हणतात. रक्तदानाच्या रूपाने आपण मानवतेला एक मोठी देणगी बहाल करतो. रक्तदान केल्याने कोणतीही इजा किंवा दुष्परिणाम होत नाही. मनुष्याच्या शरीरात ५ लिटर रक्त असते आणि रक्तदानात केवळ ३५० मिली इतकेच रक्त घेतले जाते त्यामुळे कोणतीही कमजोरी जाणवत नाही. विशेष म्हणजे २४ ते ४८ तासात जेवढे रक्त आपण दान दिले आहे तेवढे पूर्ववत होते. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने पुढे येऊन रक्तदान केले पाहिजे. रक्तदान सर्वश्रेष्ठ दान असे म्हणून प्रचार होत असला तरी आपल्याकडे रक्तदात्यांची संख्या खुपच कमी आहे. भारतात फक्त ०.६ टक्केच लोक रक्तदान करीत असतात. १३० कोटी लोकसंख्येच्या देशात हे प्रमाण खूप कमी आहे त्यामुळे देशात रक्ताची खूप कमतरता भासते त्यात कोरोना सारख्या महामारीत तर अभूतपूर्व परिस्थिती निर्माण होते. अपघातातील रुग्ण, प्रसव काळ, अतिदक्षता विभाग, तातडीच्या शस्त्रक्रिया अशा वेळी रक्ताची गरज निर्माण होते जर रुग्णांना वेळीच रक्त मिळाले नाही तर त्यांचा मृत्यूही होऊ शकतो त्यामुळे प्रत्येकाने सजग राहायला हवे. आपल्या रक्तामुळे कुणाचा तरी प्राण वाचणार आहे. रक्तदान म्हणजे जीवनदान, रक्तदान सर्वश्रेष्ठ दान हे लक्षात घेऊन प्रत्येकाने रक्तदान करायला हवे.

# राज्य महामार्गावरील खड्डे पाच दिवसात बुजवा अन्यथा महामार्गावर आंदोलन करणार

## भाजपा युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष देवानंद सानप यांनी दिला इशारा

दैनिक आपला विदर्भ

■ अशोक मुंडे





राष्ट्रीय महामार्गावर ठिकठिकाणी मोठमोठाले खड्डे पडलेले असून त्या खड्ड्यांमुळे अनेक वाहनांचे अपघात सुद्धा झालेले आहेत असाच एक खड्डा लोणार तालुक्यातील ब्राह्मण चिकना गावाजवळ रोडवर पडला असुन खड्डा हुकवण्याच्या नादात बर्याच वेळा अपघात घडलेत तरीही संबंधित प्रशासण याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करतांना दिसत असुन संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली असता उडवाउडवीची उत्तरे दिली जातात महामार्गावरील हा खड्डा जणू काही मोठ्या अपघाताची वाट बघतो काय मोठा अपघात घडल्यावर खड्डा थांबणार का असा प्रश्न वाहनधारकांना पडत आहे तेव्हा संबंधित अधिकाऱ्यांनी हा खड्डा तसेच रोडवरील ईतरही खड्डे येत्या चार पाच दिवसात न बुजवल्यास महामार्गावर आंदोलन करण्यात येईल असे भाजपा युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष देवानंद सानप सांगितले आहे तेव्हाच प्रशासनाला जाग येईल असं त्यांनी सांगितलं आहे महामार्गावरील खड्डे बुजवले जातात परंतु मोठा अपघात झाल्यानंतर तर मग अपघातापूर्वी का नाही बुजवल्या जात हा सर्वसामान्य मध्ये प्रश्न उद्भवत आहे

महामार्गाच्या साईडच्या रस्त्याला मोठमोठाले खड्डे पडलेले असल्यामुळे हे खड्डे चुकवण्यासाठी वाहनाचे ड्रायव्हर हे रॉंग साईडला गाडी टाकत असून समोरून येणाऱ्या गाडीच्या सोबत अपघात होण्याचे सुद्धा नाकारता येत नाही. या खड्ड्यामुळे या ठिकाणी मोठा एक्सीडेंट होण्याची भीती वर्तवल्या जात आहे संभाजीनगर ते नागपूर अशा अनेक ठिकाणच्या जलद गतीच्या बसेस वहाने हे सुद्धा वाहत असून अनेकांना या महामार्गावरील खड्ड्यांमुळे वाहनधारकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. या राज्य महामार्गावर अनेक शहरे अनेक बाजारपेठ आणि शाळा कॉलेजेस सुद्धा जोडलेले असून या महामार्गावर शाळेतील विद्यार्थी नागरिक यांची दररोज दळण-वळण या मार्गावरून चालू राहते या मार्गावर अनेक ठिकाणी खड्डे पडल्यामुळे अनेक समस्यांना आणि अडचणीचा सामना करावा लागत आहे खड्डे असल्यामुळे अपघाताची दाट शक्यता निर्माण झालेली आहे. महामार्गावरील खड्ड्यांकडे विशेष लक्ष देऊन खड्डे लवकर बुजवावे अन्यथा आंदोलन करणारच असल्याचे सानप यांनी सांगितले

# बॉलिवूडमधील राशा ठडानी आणि अभय वर्मा पडद्यावर दिसणार एकत्र

**मुंबई/प्रतिनिधी:** बॉलिवूडमध्ये तरुण आणि नव्या चेहऱ्यांची जोडी प्रेक्षकांसाठी नेहमीच उत्सुकतेचा विषय ठरते. अशा फ्रेश जोड्या सिनेमात नवीन उर्जा, वेगळं आकर्षण आणि ताजेपणा घेऊन येतात. त्यांच्यातील नैसर्गिक केमिस्ट्री प्रेक्षकांना नवीन प्रेमकथा अनुभवण्याची संधी देते. हे प्रयोग सिनेविश्वात नवे ट्रेंड निर्माण करताना दिसतात. आता अजून एक फ्रेश कपल प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे, ते म्हणजे राशा ठडानी आणि अभय वर्मा.अभिनेत्री रवीना टंडन ची मुलगी राशा ठडानीनं आझादमधून बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं. तो सिनेमा काही चालला नाही, परंतु राशा ठडानी स्टार झाली. राशा ही सौंदर्य आणि आत्मविश्वासाचं प्रतीक मानली जाते. तिच्या व्यक्तिमत्वात आकर्षण आणि सहजतेचं सुंदर मिश्रण आहे. गेल्या वर्षीचा सुपरहिट मुंजा हा चित्रपट अभय वर्मा याच्या नावावर आहे. हा एक उमदा, नैसर्गिक अभिनय शैली असलेला युवा अभिनेता आहे, ज्यानं आपल्या साधेपणातही प्रभावी अभिनय करून लक्ष वेधून घेतलं आहे.

राशा आणि अभय दिसणार एकत्र : त्याचा 'बॉय नेक्स्ट डोअर' लूक आणि प्रामाणिक अभिव्यक्ती प्रेक्षकांच्या मनात घर करत आहे. आता राशा आणि अभय हे एका नवीन प्रोजेक्टसाठी एकत्र येत आहेत. चित्रपटसृष्टीत नवीन प्रयोग नेहमीच धाडसी असतात, पण काही जोडीदार आपल्या पहिल्याच प्रयत्नात प्रेक्षकांच्या मनात घर करतात. अशीच एक ताजी, आकर्षक आणि आश्वासक जोडी म्हणजे राशा ठडानी आणि अभय वर्मा. या दोघांच्या एकत्र येण्यानं चाहत्यांमध्ये एक वेगळीच उत्सुकता निर्माण झाली आहे. राशा ठडानी, जिच्या व्यक्तिमत्वात सहजता आणि आकर्षकतेचं सुंदर संतुलन आहे, ती आपल्या दुसऱ्या सिनेमासाठी सज्ज झाली आहे. तर अभय वर्मा, ज्यानं आपल्या सहज अभिनयानं आणि सशक्त उपस्थितीनं अल्पावधीतच नाव कमावलं आहे, याबरोबरच या दोघांची जोडी पाहणं, हा एक नवा अनुभव ठरेल.

फ्रेश जोडी : राशाचा आत्मविश्वास आणि अभयचा 'बॉय नेक्स्ट डोअर' चार्म एकमेकांना छान पूरक ठरत आहे. त्यांच्या केमिस्ट्रीत एक सहजता आहे, जी पडद्यावर आणि पडद्याच्या मागेही दिसून येते. इंडस्ट्रीतील जाणकार या कास्टिंगला हटके आणि योग्य ठरवत आहेत, कारण ही जोडी पारंपरिक चौकटीत बसणारी नसून एक नवं आणि फ्रेश उदाहरण देणारी आहे. सोशल मीडियावरही या जोडीला प्रचंड प्रतिसाद मिळतोय. अनेक चाहते त्यांना जेन झी ' सुपरस्टार्स' म्हणून संबोधत आहेत. या दोघांचा आगामी प्रोजेक्ट जसजसा जवळ येतो आहे, तसतशी त्यांच्या फॅन्सची अपेक्षा आणि उत्सुकता वाढत आहे. राशा आणि अभय आपल्या कामावर लक्ष केंद्रित करून आहेत, आणि आतापर्यंत पाहिलेल्या झलकांवरून हे स्पष्ट होतं की, ही जोडी नव्या पिढीतील एक अविस्मरणीय ठसा उमटवणार आहे. कधी कधी फक्त दोन योग्य व्यक्ती एका फ्रेममध्ये एकत्र येतात आणि जादू घडते, राशा ठडानी आणि अभय वर्मा हे त्याचं परिपूर्ण उदाहरण आहे.

## एअर इंडियाचे लंडनला जाणारे विमान अर्ध्या तासात माघारी फिरले, पुन्हा मुंबईला परतले

**मुंबई/प्रतिनिधी:** एअर इंडियाची मुंबईहून लंडनला जाणारे विमान अर्धा रस्त्यातच माघारी फिरले आहे. लंडनला जाणारे विमान पुन्हा मुंबईत परत यायला निघाले आहे. फ्लाइटरडार२४ नुसार, एअर इंडियाचे विमान डअएद्मए-१२९ ने आज सकाळीच मुंबईहून लंडनला जाण्यासाठी उड्डाण केले होते. मात्र पुन्हा हे विमान मुंबईत परतत आहे. यामागचं कारण काय, हे मात्र अद्याप समोर आलेले नाही. मिळालेल्या माहितीनुसार, आज पहाटे ५ वाजून २० मिनिटांनी मुंबईहून लंडनला जाणारे विमान काहीच वेळात परत मुंबई विमानतळावर परतले आहे. यामागचे कारण ईराणने इस्त्राइलवर केलेला हल्ला असल्याचे बोलले जाते. ईराणवर इस्त्राइलने हल्ला केल्यानंतर ईराणी विमानतळ बंद करण्यात आल्यानंतर एअर इंडियाचे विमान डअएद्मए-१२९ पुन्हा मुंबईत परतत आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. ईराणवर इस्त्राइलने हल्ला केल्यानंतर ईराणचे एअरस्पेस बंद करण्यात आलं आहे. या मार्गाने जाणारी सर्व विमानाचे मार्ग वळवण्यात आले असतील किंवा विमानांना टेक ऑफ ओरिजनपर्यंत पुन्हा परतावे लागत आहे. फ्लाइटराडार २४ च्या आकडेवारीनुसार, इस्त्राइल आणि इराणवर ड्रोन आणि मिसाइल हल्ला केल्यानंतर शुक्रवारी तातडीने एअरलाइ कंपन्यांनी इस्त्राइल, ईराण आणि ईराकयेथून हवाई क्षेत्र खाली करण्यात आले आहे.

प्रवासी आणि केबिन क्रु यांच्या सुरक्षिततेसाठी एअरलाइनचे मार्ग वळवण्यात आले आहे. जगभरातील वाढत्या संघर्षामुळं एअरलाइन कंपन्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. ड्रोन आणि मिसाइलचा हल्ले हे प्रवाशांसाठी चिंतेचा विषय ठरत आहेत.

पान १ वरून...

### सोमवारपासून राज्यात नवीन शैक्षणिक

करणे हे ध्येय आहे. या कार्यक्रमांतर्गत पालकांचा अपेक्षित प्रतिसाद मिळण्याकरिता शासनाचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव यांनी 'शाळा प्रवेशोत्सव' कार्यक्रमामध्ये पालकांशी हितगुज साधावे. तसेच सर्व अधिकाऱ्यांना दत्तक शाळा घेण्याबाबत जबाबदारी देण्यात आली आहे, त्यानुसार सचिवांनी देखील पुढाकार घेऊन राज्याची शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी सहकार्य करावे, अशी विनंती शालेय शिक्षण विभागाच्या प्रधान सचिव आय.ए.कुंदन यांनी केली आहे.

शाळेस भेट देत असताना शाळेतील भौतिक सुविधांचा दर्जा, विद्यार्थ्यांच्या खेळांच्या सुविधांचा दर्जा, शाळेतील पूरक व्यवस्था, शालेय व्यवस्थेचा दर्जा, विद्यार्थ्यांच्या स्वच्छतेच्या सवयी, प्रधानमंत्री पोषणशक्ती योजनेंतर्गत देण्यात येणारा पोषण आहार आदी विविध विषयांबद्दल मान्यवरांमार्फत मार्गदर्शन केले जाणार आहे. या भेटीमुळे समाज, पालक, विद्यार्थी, शिक्षक यांचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन सकारात्मक होण्याबरोबरच बालकांना आत्मविश्वासपूर्वक व्यक्त होण्याची तसेच दर्जेदार शिक्षणाची संधी उपलब्ध होणार असल्याचा विश्वास श्रीमती कुंदन यांनी व्यक्त केला आहे.

### हरित ऊर्जा विकासाचे प्रकल्प

सह्याद्री अतिथीगृह येथे ऊर्जा विभागाच्या योजनांचा आढावा घेताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी अपारंपारिक ऊर्जा मंत्री अतुल सावे (दूरदृश्यप्रणालीव्दारे), राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, उर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, अपर मुख्य सचिव वित्त ओ.पी.गुप्ता, अपर मुख्य सचिव नियोजन राजगोपाल देवरा, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव डॉ. के. एच. गोविंदराज, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव डॉ.श्रीकर परदेशी, महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा, महापारेषणचे व्यवस्थापकीय संचालक डॉ संजीव कुमार, महानिर्मितीचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. राधाकृष्णन बी. महाऊर्जा विकास संस्थेच्या महासंचालक डॉ.कांदबरी बलकवडे यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, ऊर्जा क्षेत्रात अत्यंत महत्त्वाची आणि गेम चेंजर असलेली मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ही डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करा. पीएम सुर्यघर: मोफत वीज योजनेमध्ये राज्यातील सर्व शासकीय इमारतींचे सौर ऊर्जेव्दारे विद्युतीकरण करण्यासाठी महाऊर्जा ने योजनेतील सर्वेक्षण पूर्ण करून या कामाला गती द्यावी. मॉडेल सोलर व्हिलेज साठी महाऊर्जा व महावितरण कंपनीने संयुक्त पणे काम करावे.महाऊर्जा,निर्मिती व पारेषण विभागातील प्रत्येक प्रकल्पाची कामे गती शक्ती योजनेच्या धर्तीवर विहित वेळेत पूर्ण करा. वीज गळती कमी करण्यासाठी केंद्र शासनाच्या योजनांची प्रभावी अमंलबजावणी करून वीज वापरासाठी जनजागृती करण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, त्याचबरोबर स्थानिक स्वराज्य संस्थाकडील वीजदेयकाच्या थकबाकी वसूलीची योजना,भविष्यकाळातील विजेची वाढती मागणी लक्षात घेता विज वितरण यंत्रणा सक्षम करणे गरजेचे आहे.आगामी काळात हरित ऊर्जा विकासावर भर देण्याची गरज आहे. हायड्रोजन परिसंस्थेच्या विकासासाठी धोरणातंर्गत करण्यात येणारे संशोधन व विकास प्रकल्प,कौशल्य विकास यावर देखील भर देण्यात यावा.वीज क्षेत्रात शाश्वत विकासाभिमुख योजनांची गरज असून, यावेळी ऊर्जा विभागातील विविध प्रकल्पांची सद्यस्थिती आणि त्याचा आढावा त्यांनी यावेळी घेतला.

### अपघातग्रस्त विमानात राष्ट्रवादीचे

अपर्णा महाडिक माझ्या धाकट्या बहिणीची सून आहे. त्यांचे कुटुंब मुंबईतील गोरेगाव येथे राहते.''

महाडिक कुटुंबाला कळवण्यात आलंय- तटकरे : रायगडचे खासदार तटकरे पुढे म्हणाले की, '' माझा भाचा म्हणजेच अपर्णाचा पती हा देखील एअर इंडियाच्या केबिन क्रूमध्ये आहे. तो दिल्लीत होता. महाडिक कुटुंबाला या दुर्घटनेची माहिती देण्यात आली आहे.

एअर इंडियाचे हे विमान अहमदाबादहून लंडनला जात होते. या विमान अपघातात १२ क्रू मेंबर्ससह २४१ जणांचा मृत्यू झाला आहे. अहमदाबाद विमानतळावरून उड्डाण केल्यानंतर काही वेळातच एअर इंडियाच्या विमान डअएद्मए१७१ ला झालेल्या अपघातात अपर्णा महाडिक (४२) या मृत्युमुखी पडल्या. बोईंग ७८७ ड्रीमलायनर विमान अहमदाबादहून लंडन(गॅटविक)ला जात होते आणि त्यात २४२ प्रवासी होते.

विमानात प्रवाशांमध्ये गुजरातचे माजी मुख्यमंत्री आणि भाजपा नेते विजय रुपाणी हे देखील होते. या विमान अपघातात एक व्यक्ती बचावलाय. माहिती देताना अहमदाबादचे पोलीस आयुक्त म्हणाले की, या अपघातात एक व्यक्ती बचावलीय, ज्यावर उपचार सुरू आहेत. अहमदाबाद सिव्हील हॉस्पिटलमध्ये मेडिकल इमर्जन्सी जाहीर करण्यात आली आहे. रुग्णालयाबाहेर मोठी गर्दी दिसून येत आहे.एअर इंडियाचे विमान गुरुवारी दुपारी सरदार वल्लभभाई पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळील मेघनानी नगरमधील सिव्हिल हॉस्पिटल आणि बीजे मेडिकल कॉलेजमधील डॉक्टर आणि नर्सिंग स्टाफच्या निवासी निवासस्थानाजवळ कोसळले. विमानाचा काही भाग बीजे मेडिकल कॉलेजच्या वसतिगृहाच्या इमारतीवरही पडला. तिथे मदत आणि बचाव कार्य वेगाने सुरू आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींपासून ते गृहमंत्री अमित शाह आणि नागरी उड्डाण मंत्री यांच्यापर्यंत सर्वजण या संदर्भात सतत माहिती घेत आहेत.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### अहमदाबाद विमान दुर्घटनेवर जयंत पाटील यांची प्रतिक्रिया



दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी:** ड्रीमलाइनर हे एक सुरक्षित असं विमान समजलं जाते. त्यामुळे टेक्निकल काही तरी फॉल्ट झाला असेल, ब्लैक बॉक्स मधून समोर येईल नेमका कशामुळे अपघात झाला हे माहीत नाही. जी घटना घडली त्याची जबाबदारी घ्यायला पाहिजे. मात्र, अलीकडच्या काळात अशी काही जबाबदारी घेताना दिसत नाही.अशी प्रतिक्रिया बँकांवर होणारे सायबर अटॅक कसे थांबवावे, यासाठी प्रशिक्षण केंद्राचे आज वाशी येथे उद्घाटन करण्यात आले. यावेळी (शरदचंद्र पवार गट) राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

### उद्धव ठाकरे यांनी भेटायला बोलावले तर मी जाणार; मंत्री संजय शिरसाट यांची माध्यमांशी प्रतिक्रिया



दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी:** ठाकरे कुटुंब एकत्र येत असेल, यावर आमच्या शुभेच्छा आहेत. भेट झाली यात काही राजकीय चर्चा झाल्या आहेत, शरद पवार व अजित पवार भेटी होतात, मी उद्धव ठाकरे यांनी बोलावले तर भेटायला जाईल, अशी प्रतिक्रिया मंत्री संजय शिरसाट यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी ते म्हणाले की, उठावानंतर महाविकास आघाडीच्या नेत्यांना अंगावर घेण्याचं काम केलं होत, त्या अर्थाने मी बोललो.मला इम्तियाज जलील बद्दल बोलायचं नाही, मला थोडा वेळ द्या, पूर्ण ताकदीनिशी मी बोलेल. विमान दुर्घटना सर्व देशाला जाणीव करून देणारे होते. मन हेलावणारी लागणारी घटना होती, अनेकजण गेले आहेत, चूक कशी झाली, कोणामुळे झाली, याची चौकशी होईल. भविष्यात अशा घटना घडू नये, याचा पुरातन केला जाणार.मला पण निधी दिला जात आहे, माझी नाराजी नाही, माझी दादाची भेट झाली. ठाकरे कुटुंब एकत्र येत असेल, यावर आमच्या शुभेच्छा आहेत. भेट झाली यात काही राजकीय चर्चा झाल्या आहेत, शरद पवार व अजित पवार भेटी होतात, मी उद्धव ठाकरे यांनी बोलावले तर भेटायला जाईल, यात परत राजकीय चर्चा करू नका. आदित्य ठाकरे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा, त्यांनी चांगले राहावं, चांगलं वागाव, चांगलं बोलावे. लवकर लग्न करावे, वडिलांसुद्धा सुद्धा त्रास होता कामा नये, याची काळजी घ्यावी. भविष्यात चांगला मोठा नेता व्हावा. या मनापासून शुभेच्छा. अशी प्रतिक्रिया सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

### जळगाव जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे अनेक ठिकाणी नुकसान, पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी नुकसानग्रस्त भागाची केली पाहणी





**जळगाव/प्रतिनिधी:** जळगाव जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे मोठे नुकसान झाले असून या वादळी वाऱ्याचा केळीच्या बागांना मोठा फटका बसला आहे तर अनेक कुटुंब या वादळी वाऱ्यामुळे उघड्यावर आलेत. पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी नुकसानग्रस्त भागाची पाहणी करत प्रशासनाला तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या आहेत. दरम्यान नुकसानग्रस्तांना लवकरात लवकर मदत देण्याची आश्वासन मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले आहे.

# मनाला येईल त्याप्रमाणे प्रभाग रचना झाली

## आ. जितेंद्र आव्हाड यांचा पत्रकार परिषदेत आरोप

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** २०१७ नंतर २०२२ ला प्रभाग रचना सुरुवात झाली आहे. त्यामध्ये प्रचंड घोटाळा झाला. मनाला येईल त्याप्रमाणे प्रभाग रचना झाली.असा आरोप आमदार जितेंद्र आव्हाड यांनी पत्रकार परिषदेत केला.यावेळी ते म्हणाले की,निवडणूक आयोगाचे अधिकारी घरी बोलावून इथले राजकीय नेते प्रभाग रचना करतात. असे जर करणार असाल तर प्रभाग रचना करू नये, कोणता प्रभाग कसा होता, दोन्ही प्रभाग रचना आहे, पुरावे आहेत. आमच्याकडे महापालिका आयुक्त फक्त त्यावर मोहर लावतात, पण हे कसे केलं गेलं यावर कोण बघणार. माझ्याकडे दोन दोन पुरावे, शर्मा यांनी केलेली प्रभाग रचना आणि नंतर निवडणूक आयोगाने सूचना दिल्यावर केलेले प्रभाग सगळे पुरावे आहेत. प्रभाग रचना ही सत्ताधारी हाताची खेळ बनवू नये,अधिकारी ज्यांना घाबरतात. त्यांना घाबरून अधिकारी प्रभाग बनवतात. लोकशाहीची क्रूर हत्या आहे. सोमवारी पुरावे देतो पत्रकार परिषद घेऊन, निवडणूक हे स्वतंत्र आयोग आहे. १६००० मत एका रात्रीत वाढतात कसला जनतेचा कौल असा प्रश्न उपस्थित केला. पाच वर्षात जी नाव वाढली नव्हती ती चार महिन्यात वाढली, हे घडणार आहे याला कोणीही रोखू शकत नाही. गांभीर्य नाही घेतलं तर काही करू शकत नाही, न्यायालयात जाऊ, ठाणे बोरिवली बोगदा हा बोगदा मुल्ला बाग येथे येतो. तो बोगदा घोडबंदर रोड पर्यंत यावा अशी मागणी होती. तिथे येणारा बिल्डर कोण आहे ? मागच्या दोन महिन्यात त्या बोगद्याची किंमत २००० कोटींनी वाढली आहे. मला संविधानात व्यक्त होण्याचा अधिकार आहे.मला कुठे बडबड करायची ती मी करेन, मला त्याच्याशी काही करायचे नाही. अनधिकृत बांधकामाब बोलताना म्हणाले की, लोक राहायला गेल्यावर कशाला कारवाई करता. अनधिकृत बांधकाम होतात कशी? महापालिका क्षेत्रात हजारोने अनधिकृत बांधकाम झाली कारवाई झाली का? कोर्टाने कोणत्या अधिकाऱ्यांवर कारवाई केली ? कोर्टाचा आदेश असून बिल्डिंग पडत



नाही.असा आरोप आमदार जितेंद्र आव्हाड यांनी पत्रकार परिषदेत केला.

## रत्नागिरीत पावसाची जोरदार बॅटिंग; जिल्ह्याला २ दिवसांचा रेड अलर्ट चा इशारा



दैनिक आपला विदर्भ

**रत्नागिरी/प्रतिनिधी :** रत्नागिरी जिल्ह्याला हवामान खात्याने रेड अलर्ट चा इशारा दिला आहे. जिल्ह्यात सकाळपासूनच ढगाळ वातावरण होते, दुपारनंतर मात्र पावसाचा जोर वाढू लागला. रत्नागिरी बरोबरच लांजा, राजापूर, संगमेश्वर देवरुख या भागांना पावसाने चांगलेच झोडपून काढले आहे. हवामान खात्याने पुढील दोन दिवस मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. पावसासोबतच वेगवान वाऱ्याची देखील शक्यता वर्तवली आहे. जिल्ह्यात पेरणी कामे पूर्ण झाली असून, पावसाच्या जोरदार बॅटिंगमुळे बळीराजा सुखावल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

## वटपौर्णिमेच्या दिवशी महिलांना वटवृक्षाचे वितरण

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :**वटपौर्णिमेच्या दिवशी महिलांना वटवृक्षाच्या रोपाचे वितरण करण्यात आले हा कार्यक्रम वृक्षमित्र गजानन मुलंगे यांनी पींगलाक्षी देवी संस्थान परिसरामध्ये आयोजित केला होता यावेळी पिंगलाक्षी देवी तलाव परिसरात सुबाभळीच्या ५०० रोपांची लागवड करण्यात आली.

तालुक्यासह जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात अवैध वृक्षतोड होत आहे तसेच रस्ते विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात नुकसान वृक्षतोड होत आहे त्या प्रमाणात मात्र वृक्ष लागवड केल्या जात नाही वृक्ष लागवडीवर शासनाकडून दरवर्षी कोट्यावधी रुपये खर्च केल्या जातात परंतु त्या प्रमाणात वृक्ष लागवड व संगोपन होत नाही ही बाब अतिशय चिंताजनक आहे वृक्षमित्र गजानन मुलंगे हे दरवर्षी वटपौर्णिमेला



वटवृक्षाच्या रोपाची वितरण करतात यावर्षी मुलंगे यांनी वटपौर्णिमेच्या दिवशी वटवृक्षाच्या रूपाची शेकडो महिलांना वितरण केले तसेच यावेळी पिंगलाक्षी देवी संस्थान च्या परिसरात पाचशे सुबाभळीची लागवड करण्यात आली या कार्यक्रमाच्या यशस्वी ते करिता सीमा मूलंगे ,सारिका वाघमारे ,सोनाली वाघमारे, देविका थोरात, ऋतुजा वाघमारे, मेघा गोटे ,शिल्पा आकमार, दिनकर गोटे, गुणवंत थोरात, राहुल भुतेकर यांनी सहकार्य केले.

## इस्रायलकडून इराणवर मोठा एअर स्ट्राईक, अणवस्त्र केंद्रांवर हल्ला, कमांडर्स अन् अणुशास्त्रज्ञांचा मृत्यू



नवी दिल्ली : इस्रायलकडून शुक्रवारी पहाटे इराणची राजधानी तेहरानवर क्षेपणास्त्र आणि ड्रोनच्या साहाय्याने मोठा हल्ला केल्याची माहिती समोर आली आहे. या हल्ल्यात इराणचे मोठे नुकसान झाले आहे. इस्रायलने इराणच्या राजधानीवर लढाऊ विमाने, क्षेपणास्त्र आणि ड्रोनमधून बॉम्बचा मारा केला. याशिवाय, इराणी लष्कराचे महत्त्वाचे तळ आणि अणवस्त्रं असलेल्या केंद्रांवरही इस्रायलने हल्ला केला. या हल्ल्यामुळे तेहरानमध्ये स्फोटाचे आवाज ऐकू येत होते. इस्रायलच्या लष्करी अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, त्यांनी इराणच्या तब्बल १२ हून अधिक लष्करी तळ आणि अणवस्त्रं असलेल्या केंद्रांवर हल्ला केला आहे.

इस्रालयने अणवसत्रं असलेल्या केंद्रांवर केलेल्या हल्ल्यात इराणचे अनेक कमांडो जवान आणि अणुशास्त्रज्ञ ठार मारले गेल्याची माहिती आहे. पंतप्रधान बेंजामिन नेत्यानाहू यांनी म्हटले की, आम्ही इराणमधील मुख्य अणवस्त्र केंद्र असलेल्या नतांज येथील तळाला लक्ष्य केले. तसेच अणुबॉम्ब तयार करत असलेल्या वैज्ञानिकांनाही लक्ष्य करण्यात आले. याशिवाय, इराणच्या बॅलेस्टिक क्षेपणास्त्रांच्या तळावरही हल्ला करण्यात आला. या हल्ल्यानंतर बेंजामिन नेत्यानाहू यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे आभार मानले आहेत.

इस्रायलने इराणवर केलेल्या या हल्ल्याचे पडसाद संपूर्ण जगभरात उमटणार आहेत. या हल्ल्यामुळे पुन्हा युद्धाचा भडका उडण्याची दाट शक्यता आहे. युद्धाच्या सावटामुळे जगभरातील भांडवली बाजारात मोठी पडझड होण्याची शक्यता आहे. शुक्रवारी भारतीय शेअर बाजारावरही याचा परिणाम दिसून आला. सकाळी बाजार उघडताच सेन्सेक्स तब्बल ८५० अंकांनी कोसळला. तर निफ्टीमध्येही २६५ अंकांनी कोसळला.

इराणी चीफ ऑफ स्टाफ मोहम्मद बाघेरी यांच्या मृत्यूचा दावा

इराणच्या लष्करी मुख्यालयावर, दोन अणुऊर्जा केंद्रांवर, खठऋछ (इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्स) च्या वरिष्ठ कमांडरांवर आणि अणुशास्त्रज्ञांवर लक्ष्य करून हल्ले करण्यात आले आहेत. इराणच्या सशस्त्र दलांचे चीफ ऑफ स्टाफ मोहम्मद बाघेरी यांना ठार मारण्यात आले आहे, असा दावा देखील इस्रायलने केला आहे. दरम्यान, इराणच्या माध्यमांनी, दोन अणुऊर्जा स्थळांवर हल्ले झाल्याची पुष्टी केली आहे.

इस्रायल आणि इराण यांच्यात अनेक वर्षांपासून तणावाचे संबंध आहेत. इस्रायलने यापूर्वीही इशारा दिला होता की, जर इराणने शस्त्र बनवण्यायोग्य युरेनियमचा संवर्धन प्रकल्प सुरूच ठेवला, तर तो लष्करी कारवाई करेल. आंतरराष्ट्रीय निरीक्षकांचे म्हणणे आहे की, इराणचे युरेनियम संवर्धन कार्य आता शस्त्रनिर्मितीच्या पातळीपर्यंत पोहोचले आहे. त्यामुळे इस्र्यालने इराणवर हल्ला केल्याचे सांगितले जात आहे.

# प्रधानमंत्री धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान

## १५ ते ३० जूनपर्यंत विशेष शिबिराचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** आदिवासी समुदायांचे सशक्तीकरण करण्यासाठी प्रधानमंत्री धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान राबविण्यात येत आहे. अभियानांतर्गत जिल्हाभरात दि. १५ ते ३० जून या कालावधीत विशेष शिबिराचे आयोजन केले जाणार आहे. या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

भारत सरकारने जनजातीय गौरव वर्ष २०२५ च्या निमित्ताने भारत सरकारने आदिवासी समुदायांच्या सर्वांगीण विकासासाठी दोन महत्त्वपूर्ण आणि कालबद्ध उपक्रम हाती घेतले आहेत. प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महा अभियान आणि धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान अंतर्गत आदिवासी नागरिकांना सक्षम बनवण्यासाठी केंद्र सरकारकडून व्यापक योजना राबविण्यात येत आहेत.

या उपक्रमांद्वारे धरती आबा अभियान (जागरुकता आणि संपृक्तता मोहीम) आणि धरती आबा कर्मयोगी (क्षमता बांधणी कार्यक्रम) द्वारे बहु-क्षेत्रीय सेवा थेट गाव पातळीवर पोहोचवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. आधार कार्ड, रेशन कार्ड, आयुष्मान भारत कार्ड , जात प्रमाणपत्र, पीएम- किसान, जन धन खाते आदी महत्त्वाचे वैयक्तिक लाभ एकाच ठिकाणी मिळवून देण्यासाठी १५ ते ३० जून २०२५ दरम्यान गाव स्तरीय आणि क्लस्टर स्तरीय शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. या शिबिरांचे आयोजन स्थानिक प्रशासन, विविध शासकीय विभाग, फ्रंटलाइन कर्मचारी तसेच स्वयंसेवी संस्था , कॉमन सर्व्हिस सेंटर्स यांच्या समन्वयातून करण्यात येणार आहे.

यामुळे लाभ मिळवण्यात अडथळे येत असलेल्या आदिवासी कुटुंबांपर्यंत आवश्यक सेवा पोहोचवण्यास मदत होणार आहे. या मोहिमेअंतर्गत जिल्हा प्रशासनाने जिल्हास्तरीय सूक्ष्म योजना आणि कॅम्प कैलेंडर तयार



करण्यात आले आहे. याशिवाय, सिकल सेल डे आणि आंतरराष्ट्रीय योग दिन यांसारख्या विशेष दिवसांचा उपयोगही जनजागृतीसाठी केला जाणार असल्याची माहिती एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी मोहनकुमार व्यवहारे यांनी प्रसिद्धी पत्रकाव्दारे दिली.

# कर्जमाफीबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा; मात्र माजी मंत्री बच्चू कडू आंदोलनावर ठाम

दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळावी, या मागणीसाठी प्रहारचे नेते बच्चू कडू यांनी अन्नत्याग आंदोलन सुरू केलं आहे, आज त्यांच्या अन्नत्याग आंदोलनाचा सहावा दिवस असून त्यांची प्रकृती खालावली आहे. दरम्यान आज अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी उपोषण स्थळी जाऊन बच्चू कडू यांची भेट घेतली आहे. त्यांनी बच्चू कडू यांच्यासमोरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना फोन लावला, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी फोनवरून बच्चू कडू यांच्याशी संवाद साधला. यावेळी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठी घोषणा केली असली तरी माजीमंत्री बच्चू कडू अजूनही उपोषणावर ठाम आहेत, आम्ही यावर समाधानी नाही, आम्ही उपोषण मागे घेणार नाही, असं यावेळी बच्चू कडू यांनी म्हटल्याने सरकारसमोरील अडचणीत आले आहे. अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी उपोषण स्थळी जाऊन बच्चू कडू यांची भेट घेतली. तसेच बच्चू कडू यांच्यासमोरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना फोन करून बोलने केले.यावेळी मुख्यमंत्र्यांनी कर्जमाफीसाठी तातडीने समिती तयार केली जाईल, त्या समितीमध्ये बच्चू कडू यांना घेऊ. त्या समितीचा रिपोर्ट आल्यानंतर आम्ही कर्जमाफी करू, असं फडणवीस यांनी म्हटल्याची माहिती बावनकुळे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.तसेच ज्या १७ मागण्या बच्चू कडू यांच्या आहेत, त्यासाठी आम्ही बैठक घेऊ, या बैठकीला सर्व विभागाचे मंत्री उपस्थित राहतील, या बैठकीला बच्चू कडू यांची देखील उपस्थिती असेल. दिव्यांगांचे अनुदान देताना ते बजेटमध्ये आनावं लागतं, त्यामुळे येणाऱ्या अधिवेशनात ते मांडण्यात येईल. त्यामध्ये किती वाढ करायची, ते मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री व बच्चू कडू ठरवतील.असे म्हणाले. दरम्यान शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवर चर्चा झाली असता, मुख्यमंत्री म्हणाले की, कर्जदार शेतकऱ्यांची संपूर्ण माहिती घेऊन तो डेटा जमा केला जाईल व नंतर त्यावर तोडगा काढू, असंही बावनकुळे यांनी यावेळी म्हटलं. मात्र, त्यानंतर लगेचच बच्चू कडू यांनी तिथे उपस्थित शेतकऱ्यांना विचारलं की हा निर्णय तुम्हाला मान्य आहे का? त्यावर सर्वांनी आम्हाला हा निर्णय मान्य नसून, सरसकट कर्जमाफी व्हावी, असं म्हटले. कर्जमाफी होईपर्यंत नवीन कर्ज देण्यासाठी मी येणाऱ्या कॅबिनेटमध्ये चर्चा करेल व निर्णय घेऊ, असं अश्वासनही यावेळी बावनकुळे यांनी दिलं आहे. मात्र बच्चू कडू हे अजूनही आपल्या उपोषणावर ठाम आहेत, आम्ही यावर समाधानी नाही, आम्ही उपोषण मागे घेणार नाही, असं यावेळी बच्चू कडू यांनी म्हटले आहे.त्यामुळे सरकार अडचणीत आले आहे.





### बच्चू कडू यांची प्रकृती चिंताजनक

बच्चू कडू यांनी रक्ताच्या उलट्या केल्या असून, उपचार घेण्यास नकार दिला आहे. पोटात अन्नाचा कणही नाही, बच्चू कडूंची तब्येत खालावली आहे. बच्चू कडू यांना सकाळी रक्ताच्या उलट्या झाल्या. उपचार घेण्यास बच्चू कडू यांनी नकार दिला आहे. कुठलीही सलाईन घेणार नाही, अशी भूमिका त्यांनी जाहीर केली.पोटात अन्न नसल्याने बच्चू कडू यांच्या किडनी व शरीराच्या इतर भागावर परिणाम झाला आहे. वैद्यकीय पथकाकडून बच्चू कडू यांच्या शरीराची पूर्णपणे तपासणी करण्यात आली आहे. बच्चू कडू यांना डॉक्टरांकडून सलाईन घेण्याचा सल्ला देण्यात आला. मात्र बच्चू कडू यांचा सलाईन घेण्यास नकार दिला. कार्यकर्ते व शेतकऱ्यांकडून बच्चू कडू यांना सलाईन घेण्याची विनंती करण्यात आली, मात्र मागण्या पूर्ण होईस्तर आपण औषधोपचार घेणार नाही, असा पवित्रा कडू यांनी घेतला आहे. मंत्री भरत गोगावले, मंत्री पंकजा मुंडे, मंत्री जयकुमार गोरे या मंत्र्यांसोबत मागण्या संदर्भात बच्चू कडू यांची ऑनलाइन बैठक झाली. मात्र, या ऑनलाईन बैठकीमध्ये ठोस आश्वासन न मिळाल्याने बच्चू कडू उपोषणावर ठाम आहेत.

## विविध वृत्त...

### बच्चू कडू यांची कृषिमंत्र्यांसह अन्य मंत्र्यांशी ऑनलाईन चर्चा



दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** दिव्यांग, विधवा, शेतकरी शेतमजूर शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी अशा विविध मागण्यासाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष माजी मंत्री बच्चू कडू यांनी अमरावतीच्या गुरुकुंज मोझरी येथे गेल्या पाच दिवसापासून अन्नत्याग आंदोलन सुरु केले आहे.

आज बच्चू कडु यांची चार मंत्र्यांसोबत ऑनलाईन व्हिडिओ कॉल द्वारे चर्चा झाली असून, दोन दिवसात परिपत्रक काढण्यात येईल. असे आश्वासन देण्यात आल्याचे उपोषणकर्ते माजी आमदार बच्चू कडू यांनी स्पष्ट केले आहे. यामध्ये ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा मुद्दा त्यांची वसुलीची अट लावण्यात आली होती, ती रद्द करण्यात आली आहे. तसेच कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंध वर पंधरा दिवसात निर्णय घेण्यात येण्याचे बच्चू कडू यांना सांगण्यात आले आहे. मेंढपाळांचे प्रश्न निकाली काढण्यात येइल. यासाठी पंधरा दिवसाचा अवधी मागितला आहे. पेरणी ते कापणी पर्यंत, संत्रा, केळी, चिकू, मोसंबी, आंबा या फळ पिकांसाठी ३/४ एमआरजीएस वरून कव्हर करावे, यासाठी कॅबिनेट समोर प्रस्ताव येत्या १५ दिवसात ठेवणार आहे. उद्या पालकमंत्री पाच वाजता येणार आहे. मुख्यमंत्री तसेच दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करून शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर निर्णय घेतली. तसेच सुप्रिया सुळे यांनी बच्चू कडू यांची प्रकृतीची विचारणा केली. असल्याचे कडू यांनी माध्यमांना सांगितले.

### बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाला मनोज जरांगे पाटील यांचा पाठिंबा



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** प्रहारचे नेते माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाला मनोज जरांगे पाटील यांचा पाठिंबा. राज्यभरातील सर्व शेतकऱ्यांनी आपले एक दिवसाचे काम बाजूला ठेवून, या चक्काजाम मध्ये सहभागी होण्याच आवाहन मनोज जरांगे पाटील यांनी केले आहे.

### वादळी वाऱ्यासह पावसामुळे परिसरातील नुकसानीची आमदार संजय गायकवाड यांनी केली पाहणी





**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा शहरामध्ये वादळीवारा तसेच पावसामुळे नुकसान झालेल्या परिसराची तसेच पडझड झालेल्या घराची आमदार संजय गायकवाड यांनी आज पाहणी केली. काल बुलढाणा शहरांमध्ये तसेच परिसरामध्ये वादळी वाऱ्यासह पावसाने थैमान घातले होते. यावेळी शहरांमधील अण्णाभाऊ साठे नगर तसेच ग्रेन मार्केट परिसरातील घरांचे मोठे नुकसान झालेले आहे. यावेळी बुलढाणा विधानसभा मतदारसंघाचे आमदार संजय गायकवाड यांनी आज घटनास्थळावर जाऊन पाहणी केली. तसेच नागरिकांच्या समस्या ऐकून घेतल्या. यावेळी बुलढाणा नगरपालिकेचे मुख्याधिकारी गणेश पांडे, आरोग्य निरीक्षक सुनील बेंडवाल, मा.आरोग्य सभापती आशिष जाधव यांच्यासह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

### विजयपुर-संकेश्वर राष्ट्रीय महामार्गावर भीषण अपघात; ३ जणांचा मृत्यू

**कोल्हापूर/प्रतिनिधी ::** विजयपुर-संकेश्र्वर राष्ट्रीय महामार्गावर अथणी इथं भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. या भीषण अपघातात तीन जणांचा मृत्यू झाला आहे. हा अपघात एका लॉरी, पिकअप ट्रक, इनोव्हा आणि स्कॉर्पिओमध्ये झाला आहे. या अपघातात कोल्हापूर जिल्ह्यातील तिघांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळाली आहे.

### रिसॉर्टमध्ये देहव्यापार चालवणाऱ्याचं रॅकेट उघडकीस

दैनिक आपला विदर्भ



**नागपूर /प्रतिनिधी :** टेंभूर्णका टायगर रिसॉर्टमध्ये पोलिसांनी धाड टाकत देहव्यापार रॅकेटचा पर्दाफाश केला. कारवाईदरम्यान आठ महिलांची सुटका करण्यात आली असून पाच आरोपींना अटक करण्यात आली आहे. मुख्य आरोपी विशाल इंगोले (रिसॉर्ट मालक), अमित ठाकरे, संजय धापोडकर, सचिन पाटील आणि एक महिला यांना ताब्यात घेण्यात आलं आहे. नागपूरहून महिलांना देवव्यापारासाठी आणलं जात होतं. काही ग्राहकांना ही पोलिसांनी पकडलं आहे. संपूर्ण प्रकरणाचा पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे. या धडक कारवाईने परिसरात खळबळ उडाली आहे.

### राज्यात प्रतिबंधित असलेल्या HTBT कपाशी बियाण्याची जळगाव जामोद मध्ये विक्री उघड, कृषी विभागाच्या पथकाची कारवाई





दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यात राज्यात प्रतिबंधित असलेल्या बियाण्याची अवैधरित्या विक्री होत असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे, जळगाव जामोद शहरातील आचल नगर परिसरातील एका व्यक्तीकडे विक्रीच्या उद्देशातून आणलेल्या HTBT बियाण्याचा साठा असल्याची माहिती कृषी विभागाच्या भरारी पथकाला प्राप्त झाली होती. त्यानुसार कृषी विभागाच्या संयुक्त पथकाने संबंधित व्यक्तीच्या घरी छापा टाकून तपासणी केली असता घरामध्ये HTBT कपाशी बियाण्याचे ५९ पाकिटे आढळून आली आहेत. HTBT हे कपाशीचे बियाणे पर्यावरणास हानिकारक असल्याने हे बियाणे महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित करण्यात आले आहे. याप्रकरणी कृषी विभागाने जळगाव जामोद पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून अशोक रंधाळे यांच्या विरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे, दोन वर्षातील ही कृषी विभागाची मोठी कारवाई मानली जात आहे.

## रखडलेला रस्ता अजून किती घेणार बळी

### रिसोड मालेगाव रस्त्यावर दुचाकी घसरून एकाचा मृत्यू; लिंगा फाट्यावरची घटना

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** रिसोड मालेगाव रस्त्याचे लिंगा फाट्याजवळ मागील कित्येक वर्षापासून काम रखडले आहे त्यामुळे या ठिकाणी अपघाताची मालिका सुरूच असून रखडलेला रस्ता आणखी किती बळी घेणार असा प्रश्न सर्वसामान्य नागरिक विचारत आहेत या ठिकाणी होत असलेल्या अपघाताला जबाबदार कोण असाही प्रश्न उपस्थित होत आहे.

रिसोड ते मालेगाव या रस्त्यावर लिंगा फाटा व किनखेडा या दोन ठिकाणी अजूनही रस्त्याचे काम रखडलेले आहे गेली अनेक वर्षे पासून सदर रस्त्याचे काम सुरू असून अद्यापही सदर रस्ता पूर्ण झालेला नाही. लिंगा फाटा व किनखेडा या ठिकाणी रखडलेल्या रस्त्याचे काम व या ठिकाणी पडलेले मुरूम गिट्टी दगड यामुळे या ठिकाणी दररोज छोटे-मोठे अपघात हे नित्याचे झाले आहेत त्यामुळे हा रखडलेला रस्ता आणखी किती बळी घेणार असा प्रश्न सर्वसामान्य नागरिक करत असून या दररोज होत असलेल्या अपघातास जबाबदार कोण असाही प्रश्न उपस्थित होत आहे या रस्त्यावरील येजा करणाऱ्या नागरिक व स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा निवेदन देऊन मागण्या करून सुद्धा अद्यापही या रस्त्याचे काम पूर्ण झालेले नाही अखेर रखडलेल्या रस्त्या कामामुळे एका निष्पापाचा बळी गेल्याची घटना दिनांक १२ जून रोजी रात्री साडेआठ वाजता लिंगा फाट्यावर घडली. सुनील सिताराम खिल्लारे वय ४३ राहणार गांधीनगर मालेगाव असे मृतकाचे नाव असून स्थानिक नागरिकांच्या कडून मिळालेल्या माहितीनुसार लिंगा फाट्यावर एका बाजुला एक वाहन उभे होते तर दुसऱ्या बाजूने रस्त्यावर पडलेली गिट्टी व दगड यामुळे खिल्लारे यांना याचा अंदाज आला नाही व त्यांची दुचाकी होंडा शाईन क्रमांक एम एच ३७ ए ७३१७ हे नियंत्रण सुटल्याने घसरली व या ठिकाणी अस्ताव्यस्त पडलेल्या दगडावर त्यांचे डोके आपटले गेले व त्यांचा जागीच मृत्यू झाला. सदर घटनेची माहिती लिंगा कोतवाल रहिवासी प्रदीप देशमुख यांनी १०८ ला फोन करून ॲम्बुलन्स बोलावली व अन्य नागरिकांच्या मदतीने मृतदेह ॲम्बुलन्स मध्ये टाकून रिसोड येथील ग्रामीण रुग्णालय येथे आणण्यात आला आज दिनांक १३ जून रोजी शेवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला.

### पाणी टंचाई निवारणार्थ बुलढाणा तालुक्यातील बोरखेड गावासाठी टँकर मंजूर

**बुलढाणा/प्रतिनिधी :** पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता बुलढाणा तालुक्यातील बोरखेड गावासाठी पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. आदेशात ठरवून दिल्याप्रमाणे नियमित टँकरव्दारे पाणी पुरवठा केल्या जाणार आहे, अशी माहिती बुलढाणा उपविभागीय अधिकारी यांनी दिली.

बोरखेड येथे ३१० पशुधन संख्या व १ हजार ८०३ लोकसंख्येसाठी एक टँकरद्वारे ५१ हजार ३०० लिटर्स पाणी पुरवठा दररोज करणार आहेत. पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. टँकरने केलेल्या खेपांची ग्रामपंचायतीला नोंद घेण्यात यावी. नोंदवहीची तपासणी नियमितपणे गटविकास अधिकारी यांनी करावी. निवीदाधारकाने टँकर नादुरूस्त झाल्यास त्वरित दुसरे टँकर उपलब्ध करून द्यावे, असे उपविभागीय अधिकारी यांनी प्रसिद्धीपत्रकाव्दारे कळविले आहे.

## मुख्याधिकाऱ्यांनी केली जलशुद्धीकरण केंद्राची पाहणी

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** मुख्याधिकारी तथा प्रशासक सतीश शेवदा यांनी येथील जलशुद्धीकरण केंद्राची पाहणी करून जलशुद्धीकरण केंद्रावर कार्यरत कर्मचाऱ्यांना सूचना दिल्या.

मागील काही दिवसापासून शहराला गढूळ पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत मे महिन्याच्या शेवटच्या पंधरवड्यात पडलेल्या अवकाळी पावसामुळे आडोळ प्रकल्पाची पाणी पातळी थोड्या प्रमाणात वाढली असली तरी या अवकाळी पावसामुळे धरणातील पाणी गढूळ झाले आहे परिणामी मागील आठ ते दहा दिवसापासून शहराला गढूळ पाणीपुरवठा होत आहे त्यामुळे शहराला गढूळ पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून प्राप्त झाल्या आहेत त्या अनुषंगाने काल दिनांक १२ मे रोजी मुख्याधिकारी तथा प्रशासक सतीश शेवदा यांनी जलशुद्धीकरण केंद्राची पाणी केली जलशुद्धीकरण करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या घटकांची संपूर्ण माहिती घेऊन जलशुद्धीकरण केंद्राची संपूर्ण पाहणी करून तातडीने गढूळ पाणीपुरवठा का होत आहे तसेच याबाबत तातडीने उपाययोजना करण्याचे आदेश दिले जलशुद्धीकरण केंद्रावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सूचना दिल्या.



उन्हाळ्यामुळे आडोळ प्रकल्पाची पाणी पातळी खालावल्यामुळे व मध्यंतरी झालेल्या पावसामुळे पाणी गढूळ होत आहे त्यामुळे येणारे पाणी थोड्याफार प्रमाणात गठुळ होत आहे याबाबतची सखोल चौकशी केली आहे लवकरच पूर्वीप्रमाणेच स्वच्छ पाणीपुरवठा होईल.

**-सतीश शेवदा**
**मुख्याधिकारी तथा प्रशासक नगरपरिषद रिसोड.**

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या आडोळ प्रकल्पाची पाणी पातळी खालावल्यामुळे व मागील महिन्यात झालेल्या पावसामुळे पिवळसर पाणी येत होते स्वच्छ पाणी पुरवठा करण्यात साठी प्रयत्न केले जात आहेत दररोज जलशुद्धीकरण केंद्रावर जाऊन पाहणी करत आहे.

**-किशोर डाखोरे**
**अभियंता पाणीपुरवठा विभाग नगरपरिषद रिसोड**